विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. तागडगाव, ता. शिरुर (का.) जि. बीड या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण कर्जदार खातेदार प्रतिनिधी मतदार संघातील (०१) व अनुसूचित जाती / जमाती मतदार संघातील (०१) एकुण ०२ रिक्त झालेल्या संचालकांच्या उर्वरित कालावधीसाठी संचालक निवडीकरीता मा. सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. शिरुर (का.) जि.बीड यांचे आदेश दि. २०/०८/२०२५ अन्वये श्री. ए.बी.कांबळे, यांची अध्यासी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली असुन यांचे अध्यक्षतेखाली दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. शिरुर (का.) जि.बीड यांचे कार्यालयात संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत अवाहन करण्यात येत आहे.

सभेतील विषय (१) :– विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. तागडगाव, ता. शिरुर (का.) जि. बीड या संस्थेच्या उर्वरित कालावधीसाठी संचालक मंडळातील सर्वसाधारण कर्जदार खातेदार प्रतिनिधी मतदार संघातील (०१) व अनुसूचित जाती / जमाती मतदार संघातील (०१) एकुण (०२) रिक्त झालेल्या संचालकांच्या निवडीबाबत.

सभेत नैमत्तिकपणे रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

| अ. क्र | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती | सकाळी ११.०० ते सकाळी १२.०० |
| २ | नामनिर्देशन पत्र छाननी | सकाळी १२.०० ते दुपारी १२.३० |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्दी | दुपारी ०१.०० |
| ४ | नामनिर्देशन पत्र माधार | दुपारी ०१.०० ते दुपारी ०१.३० |
| ५ | अंतीम उमेदवाराची यादी जाहीर करणे | दुपारी ०१.३० |
| ६ | मतदान प्रक्रिया | दुपारी ०२.०० ते दुपारी ०२.३० |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी ०२.३० ते दुपारी ०३.०० |
| ८ | निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषीत करणे | दुपारी ०३.०० |

टिप : निवडणूक कार्यक्रमातील वेळेत आवश्यकतेनूसार फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.
सभा दिनांक : २२ सप्टेंबर, २०२५.
ठिकाण :– सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. शिरुर (का.) जि.बीड
(मा. अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने)

गटसचिव
विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म.
तागडगाव, ता. शिरूर (का.)जि.बीड

---

### जाहीर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**
Under the Consumer Protection Act, 2019
CONSUMER CASE NO. DC/470/CC/287/2023
Petitioner / Appellant - HANUMAN S/O. KESHAV NAGARGOJE
Versus
Opposite Party / Respondent Name: - ANITA W/O. BABAN SHINDE, PRESIDENT, JIJAU MASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK
To.
Opposite Party / Respondent(s)
1. ANITA W/O. BABAN SHINDE, PRESIDENT, JIJAU MASAHEB MULTISTATE CO- OP. CREDIT SOCIETY LTD. BEED MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK R/O RAJIV GHANDHI CHOWK CANOL ROAD BEED. BEED MAHARASHTRA
2. ASHWINI W/O SUNIL WANDHARE, MUKHY PRAMBHADAK JIJAU MA SAHEB MULTI STATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED. MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK BEED.
R/O. NEAR VASHNAVIDEVI TEMPLE, VIPRA NAGAR, PETH BEED, TQ. BEED BEED MAHARASHTRA

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०६/१०/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत.जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.
दिनांक – ०९/०९/२०२५
ठिकाण – बीड
शिक्का

(स्वाक्षरीत)
प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार,
निवारण आयोग, बीड.

---

### जाहीर प्रगटन

**मा.श्री. कृष्णाराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३८८ / २०२५
सुरेश वि. निरंक

मागणी :– भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. अर्जदारः १. सुरेश पि. दशरथ घोडके, वयः ५५ वर्ष, धंदा: शेती, रा. सफेपुर, ता. जि. बीड, २. ज्ञानेश्वर पि.सुरेश घोडके, वय: २५वर्ष, धंदा शिक्षण, रा. वरील प्रमाणे, ३. श्रीनिवास पि.सुरेश घोडके, वयः २३ वर्ष, धंदाः शिक्षण, रा. वरील प्रमाणे

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मीबाई सुरेश घोडके, राहणार सफेपुर, ता. जि. बीड हे दिनांक २७/११ / २०२४ रोजी राहत्या घरी सफेपुर ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ हे मयताचे पती असुन अर्जदार क. २ मयताचे मुले आहेत.

मयत नामे लक्ष्मीबाई सुरेश घोडके, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत लक्ष्मीबाई सुरेश घोडके, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुंढील तारीख १८/१०/२५ आहे.

आज दिनांक १०/०९/२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.
(विधीज्ञ श्री. घोडके एस. डी.)
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. गिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
किरकोळ दिवाणी अर्ज १३४० / २०२५
प्रयागा भारत भालेकर व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :– १. प्रयागा भारत भालेकर, वय–७६ वर्षे, धंदा–घरकाम, रा. शाहुनगर पश्चिम पूर्व, संकल्प कॉलनी, कॅनॉल रोड बीड ता. जि. बीड, २. लक्ष्मण पि. भारत भालेकर, वय– ४३ वर्षे, धंदा–मजुरी, रा. न्यू झुंजार नेता प्रेससमोर, सटवाई मैदान स्टेडीयम रोड, बीड, ३. राम पि. भारत भालेकर, वय–३८, वर्षे, धंदा–नौकरी, रा. शाहुनगर पश्चिम पूर्व, संकल्प कॉलनी, कॅनॉल रोड बीड ता. जि. बीर्डे, ४. लखन पि. भारत भालेकर, वय–३६, वर्षे, धंदा – मजुरी, रा. न्यू झुंजार नेता प्रेससमोर, सटवाई मैदान स्टेडीयम रोड, बीड (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भारत पि. राधाकिसन भालेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत भारत पि. राधाकिसन भालेकर यांचा मृत्यु दिनांक ०३.०६.२०१४ रोजी धुत हॉस्पीटल एम आय डी सी जालना रोड, चिकलठाणा औरंगाबाद येथे झाला असुन अर्जदार क ०१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील ब–याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की सदरहु अर्जदार मदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत भारत पि. राधाकिसन भालेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १७ ऑक्टोबर २०२५
(मार्फत– ॲड पंडीत आर यु.)
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १३३१/२०२५

अर्जदार– १) सुरेखा न. सुरेशराव कुलकर्णी, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. काळा हनुमान ठाणा, बीड सध्या रा. अंकुश नगर, बीड, २) रेणुका भ्र. उपेंद्र जोशी, वय–४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. जैन गल्ली, जैन मंदीरासमोर, अंबाजोगोई ता. अंबाजोगाई जि. बीड. ३) सुधीर पि. सुरेशराव कुलकर्णी, वय ४० वर्षे, धंदा व्यापार, रा. शुक्रवार पेठ, रामदासी वाडाजवळ, बी.

विरुध्द

गैरअर्जदार :– निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे सुरेश पि. काशीनाथ कुलकर्णी यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे सुरेश पि. काशीनाथ कुलकर्णी, रा. काळा हनुमान ठाणा, बीड ता. जि. बीड हे दिनांक १९/०७/२०२३ रोजी जिल्हा रूग्णालय, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ही मयताची मुलगी आहे व अर्जदार क. ३ हा मयताचा मुलगा आहे. मयताचे आई वडील ब–याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असंही म्हणणं आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिलं जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक २५/०९/२०२५

आज दिनांक ०३/०९/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
( मार्फत– ॲड. पंडीत आर. यु.)
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे १९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
किरकोळ दिवाणी अर्ज १३८१/ २०२५
विष्णू वगैरे विरुध्द निरंक

अर्जदार :– (१) विष्णु भगवान कुर्लेकर, वय ४२ वर्ष, धंदा शेती, रा. वंजारवाडी, ता. जि. बीड, (२) संजय भगवान कुर्लेकर, वय ३८ वर्ष, धंदा शेती रा. वंजारवाडी, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कसूदाबाई भ्र. भगवान कुर्लेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत कसुदाबाई भ्र. भगवान कुर्लेकर यांचा मृत्यु दि. २३/०२/२०२५ रोजी रूबी हॉस्पीटल, पुणे येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत. मयताचे पती यापुर्वीच मयत झालेले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत कसुदाबाई भ्र. भगवान कुर्लेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७ माहे सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख १३ आक्टोबर २०२५.
(ॲड. पी. आर. अंडील यांच्या मार्फत)
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती कृतिका एस.खांडरे ३ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२६८ / २०२५
सुमणबाई गोपाळराव आरडे वि. निरंक

ज्यापेक्षा गोपाळ पि. जयराम आरडे, हे दिनांक ३०.०१.२०२५ रोजी बाभळवाडी. ता.जि. बीड येथे मयत झाले आहेत. आणि तसेच अर्जदार
१– सुमनबाई भ्र. गोपाळराव आरडे, वय ७७ वर्षे, रा. बाभळवाडी, ता.जि.बीड
२– लक्ष्मण पि. गोपाळराव आरडे, वय–४४ वर्षे, रा. बाभळवाडी, ता.जि.बीड
३– बाळू पि. गोपाळराव आरडे, वय–३६ वर्षे, रा. बाभळवाडी, ता. जि.बीड
४– सुर्यषाला भ्र. बाबुराव सातपुते, वय – ४७ वर्षे, रा. बाभळवाडी, ता. जि. बीड
५– उषा भ्र, प्रभु सातपुते, वय–४४ वर्षे, रा. बाभळवाडी, ता.जि.बीड
६ सुलभा पि. बाबासाहेब आगलावे, वय – ४७ वर्षे, रा. बाभळवाडी, ता.जि.बीड
७ मोहर पि. गोपाळ आरडे, वय– ४४ वर्षे, रा. बाभळवाडी, ता.जि.बीड

अर्जदार १ हे मयत नामे गोपाळ पि. जयराम आरडे, यांचे पती असून, अर्जदार क. २ व ३ ही मुले व अर्जदार क. ४ ते ६ ह्या मयताच्या विवाहीत मुली आहेत. तसेच अर्जदार क. ७ ही मयताची अविवाहित मुलगी आहे. मयताचे आई वडील हे ब–याच वर्षापुर्वी मयत झाले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत गोपाळ पि. जयराम आरडे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ३०/०९/२०२५ आहे. आज दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.
(ॲड. रोटे.डी.एम यांच्या मार्फत)
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे ११ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
किरकोळ दिवाणी अर्ज १२६६ / २०२५
राणी व ईतर विरुध्द निरंक

अर्जदार :– १) राणी गणेशराव उपरे, वय ४३. धंदा घरकाम, रा. सुमन निवास, हनुमान मंदिर रोड, शाहुनगर, बीड, ता. जि. बीड, (२) साक्षी गणेश उपरे, वय २१. धंदा शिक्षण, रा. सदर, (३) सौरभ गणेश उपरे, वय १९, धंदा शिक्षण, रा. सदर, (४) सुधाकर बाबाजी उपरे, वय ७०, धंदा सेवानिवृत्त, रा. सदर, (५) सुमन सुधाकर उपरे, वय ६७. धंदा घरकाम, रा. सदर

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यानी या न्यायालयात मयत गणेश सुधाकरराव उपरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत गणेश सुधाकरराव उपरे याचा मृत्यु दि. ०३/०६/२०२५ रोजी सुमन निवास, हनुमान मंदिर रोड, शाहुनगर, ता जि बीड येथे झाला आहे. अर्जदारक १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क २ मुलगी आहे तर अर्जदार के ३ हा मुलगा आहे तर अर्जदार क. ४ व ५ हे मयताचे आई वडील आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन अस कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कार्ड सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत गणेश सुधाकरराव उपरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ माहे ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५ सप्टेंबर २०२५.
(मार्फत– ॲड. डी एम रोटे)
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. गिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
किरकोळ दिवाणी अर्ज १२६७/२०२५
मंगल भ्र. प्रभाकर आराक व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :–१. मंगल भ्र. प्रभाकर आराक, वय–५५ वर्षे, धंदा–घरकाम, रा. विवेकानंद शाळेजवळ, धानोरा रोड बीड, ता. जि. बीड, २. सुरेंद्र पि. प्रभाकर आराक, वय–४३, वर्षे, धंदा–नौकरी, रा. सदर ३. जितेंद्र पि. प्रभाकर आराक, वय– ४० वर्षे, धंदा–नौकरी, रा. सदर ४. स्नेहल भ्र. विजेंद्र आराक, वय–२९, वर्षे, धंदा–घरकाम, रा. सदर, ५. प्रियंका भ्र. प्रभाकर आराक विवाहापुर्वीचे नांव, प्रियंका भ्र. राहुल वानखडे विवाहानंतरचे नांव, वय–३६, वर्षे, धंदा–घरकाम, रा. विवेकानंद शाळेजवळ, धानोरा रोड, बीड, ता. जि. बीड, ह. मु. छत्रपती संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर
(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत राहिबाई भ्र. जर्नाधन आराक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत राहिबाई भ्र. जर्नाधन आराक यांचा मृत्यु दिनांक ३०.०४.२०१३ रोजी महात्मा फुले नगर, पिर बाजार, दर्गा रोड, उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे झाला. असुन अर्जदार क ०१ हा मयताची मुलगा असून अर्जदार क २ ही मयताची पत्नी असून अर्जदार क ३ ही मयताची आई आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, मदरहु अर्जदार मदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट मदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत राहिबाई भ्र. जनविन आराक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ सप्टेंबर २०२५
(मार्फत– ॲड. डी एम रोटे)
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती. मनिषा एस. पठारे, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :– १३५३ / २०२५

अर्जदार :–१. आशा भ्र.. नीळकंठ गुळवेलकर, वय ८६ वर्षे, धंदा घरकाम रा. जुनी तहसिल ऑफिस, पाटांगण गल्ली, बीड, ता.जि.बीड, २. उषा भ्र. किरणराव रुपदे, वय५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नागे निळकंठ पि. रंगनाथ गोळवलकर हे दि. ०१/०१/१९८१ रोजी खामगांव, ता. खामगांव जि.बुलडाणा येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:– ०२/०९/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीख: १६/१०/२०२५
( मार्फत विधिज्ञ श्री एस. ए. बुंदेले )
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता. जि. बीड**
किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १३८५/२०२५
CNR No. MHBI02000029362025
जगदेवी भ्र. बाब उर्फ बाबुराव महालिंगे व इतर ६ वि . निरंक

अर्जदार :–१. जगदेवी भ्र. बाबु उर्फ बाबुराव महालिंगे, वय ७५ वर्षे, धंदा – घरकाम, रा. शुक्रवार पेठ, पेठ बीड ता. जि. बीड, २. आदेश पि. बाबुराव महालिंगे, वय ५२ वर्षे, धंदा– मजुरी, रा. वरील प्रमाणे ३. राजेश पि बाबुराव महालिंगे, वय–४७ वर्षे, धंदा– मजुरी, रा. वरील प्रमाणे १४. उमेश पि. बाबुराव महालिंगे, वय–४४ वर्षे, धंदा – मजुरी, रा. वरील प्रमाणे १५. नागेश पि. बाबुराव महालिंगे, वय–३८ वर्षे, धंदा– मजुरी, रा. वरील प्रमाणे ६. योगेश पि. बाबुराव महालिंगे, वय–३४ वर्षे, धंदा – मजुरी, रा. वरील प्रमाणे, ७. जानकी भ्र. हनमंत गंगाडे, वय– ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. ऐरोली, नवी मुंबई, ता. जि. ठाणे

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ७ यांनी या न्यायालयात मयत धोंडीराम पि. बबन महालिंगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत घोंडीराम पि. बबन महालिंगे यांचा मृत्यु दिनांक २१/०२/१९७४ रोजी त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची सुन म्हणजे मयताचा एकुलता एक मुलगा मयत नामे बाबुराव धोंडीराम महालिंगे याची पत्नी असून अर्जदार क. २ ते ७ हे मयताचे नातु व नात म्हणजे मयताचा मयत मुलगा बाबुराव याची मुलं आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत धोंडीराम पि. बबन महालिंगे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक 'मराठवाडापत्र' मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी

प्रकरणातील पुढील तारीख १४/१०/२०२५
आज दिनांक ०८ माहे सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
(मार्फत – ॲड. बी. के. गायकवाड)
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. गिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
किरकोळ दिवाणी अर्ज १३५४ / २०२५
कालिदास पि. सुरेश पाटील व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :– १. कालिदास पि. सुरेश पाटील, वय – ४५ वर्षे, धंदा–शेती व व्यापार, रा. नेकनुर, ता. जि. बीड, २. सचिन पि. सुरेशराव पाटील, वय – ३७ वर्षे, धंदा– शेती व व्यापार, रा. वरीलप्रमाणे. ३. सुर्वणा भ्र. तुकाराम पोफळे, वय – ५१, वर्षे, धंदा – घरकाम, रा. सर्व्हे नं. २८, प्लॉट नं. ३, सावता नगर, संगमेश्वर, मालेगाव, जि. नाशिक, ४. सोनाली भ्र. किरण पाटील, वय – ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. कांती नगर, नगर रोड बीड ता. जि. बीड
(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सुरखा भ्र. सुरेश पाटील यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत सुरखा भ्र. सुरेश पाटील यांचा मृत्यु दिनांक २५.०२.२०२३ रोजी मडीकवर हॉस्पीटल, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे झाला असुन अर्जदार क ०१ व ०२ हे मयताचे मुले असुन अर्जदार क ३ व ४ हया मयताच्या मुली आहेत. मयताचे पती पुर्वीच मयत झालेले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार मदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याने आन त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयाने हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मदरहु मयत सुरखा भ्र. सुरेश पाटील यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या महीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १० ऑक्टोबर २०२५
(मार्फत– ॲड. एस बी शिंदे)
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड
शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक

---

### जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २९२/२०२५
शेख मुस्तफा शेख इफ्तेखार विरुध्द मुख्या.न.प.बीड

पहा,
१. शेख मुस्तफा शेख इफ्तेखार, रा. पारांगण गल्ली, जुनाबाजार बीड, ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक शेख मुस्तफा शेख इफ्तेखार यांचा दिनांक १०/०६/१९९४ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास आहे न.प.बीड ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे न.प.बीड ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २९/०९/२०२५ ही आहे.

शिक्का
(स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड.

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५ • पान ४

# नगरपरिषदेसह सामाजिक संस्थांच्या पुढाकारातून बीड शहराचे सौंदर्यीकरण

**डॉ.योगेश क्षीरसागर यांची सीओंसोबत चर्चा ; वृक्षलागवड, सुशोभीकरण, फाऊंटेन, पार्किंगच्या मुद्द्यांकडे वेधले लक्ष**

बीड । प्रतिनिधी

शहराचे सौंदर्यीकरणासाठी बीड नगरपरिषदेत मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या अध्यक्षतेखाली विविध सामाजिक संस्थांची गुरुवारी (दि.११) बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची उपस्थिती होती. शहरातील रस्त्यांचे डेव्हलपमेंट, वृक्षलागवड, स्वच्छता, सुशोभीकरण, सार्वजनिक सोयीसुविधा या विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.



या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये प्रस्तावित नवीन रोड व डीपी रोडमध्ये वृक्षारोपणासाठी जागा सोडून अंडरग्राउंड ड्रिपद्वारे पाणीपुरवठ्याची सोय करणे, बंद असलेल्या जिल्हा परिषद कन्या शाळेच्या ठिकाणी भाजी मंडई व महिला बचत गटासाठी मॉल उभारणे, शहरातील ओपन स्पेसला तारकंपाउंड करून वृक्षलागवड करणे, नवीन फुलांचे गार्डन प्रस्तावित करणे, चौक सुशोभीकरणांतर्गत शहरातील प्रमुख चौकात फाउंटेन उभारणे, सिद्धिविनायक कॉम्प्लेक्समधील आतील जागा पार्किंगसाठी उपलब्ध करणे, जालना रोड दुभाजकाचे सुशोभीकरण करणे, शहर व उपनगरातील ओपन स्पेसमध्ये घनदाट जंगल प्रकल्प उभारणे हे निर्णय घेतले. बैठकीत कोटक महिंद्रा बँकेने सामाजिक जबाबदारी अंतर्गत १ घंटागाडी व १०० डस्टबीन देण्याचे पत्र नगरपरिषदेला सुपूर्द केले. याबाबत उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. ही छोटेखानी बैठक झाली असली तरी लवकरच व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी फडसे यांनी स्पष्ट केले. या बैठकीस आय.एम.ए. जिल्हाध्यक्ष डॉ. अनंत मुळे, रोटरी क्लब अध्यक्ष विकास उमापूरकर, शहराध्यक्ष राहुल बोरा, झाडांची भिसीच्या प्रतिनिधी डॉ. नाईकवाडे, तसेच बँक ऑफ महाराष्ट्र, एचडीएफसी बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, कॅनरा बँक, कोटक बँक, आयडीबीआय आदी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी



मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा जिल्ह्यात दौरा होणार असून या दौऱ्यात अनेक महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ, जिल्हा क्रीडा संकुल उभारणी कामाचे भूमिपूजन, तसेच जिल्हास्तरीय गुरु गौरव पुरस्कार वितरण समारंभ पार पडणार आहे. या सर्व कार्यक्रमांच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, उपविभागीय अधिकारी, संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकी दरम्यान जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी सर्व विभागांनी योग्य नियोजन करुन आपापली जबाबदारी वेळेत व काटेकोरपणे पार पाडावी असे निर्देश दिले. यावेळी कार्यक्रमांचे वेळापत्रक, स्वागत समारंभाची आखणी, सुरक्षा व्यवस्था, निमंत्रितांचे नियोजन, अभ्यागंतासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी विशेष सूचना केल्या.

### बीड रेल्वे स्थानकास लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांचे नाव द्यावे - भाजपा सरचिटणीस गणेश लांडे



बीड । प्रतिनिधी

बीड रेल्वे स्थानकास लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांचे नाव द्यावे ही मागणी निवेदनाद्वारे बीड जिल्हा भाजपाचे सरचिनीस व बऱ्हाणपूरचे उपसरपंच गणेश लांडे यांनी केली आहे. या मागणीचा शासकीय पातळीवर पाठपुरावा व्हावा या मागणीसह त्यांनी हे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांना दिले आहे. हे निवेदन ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री अजितदादा पवार व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना देणार आहे अशी माहिती भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनी दिली आहे. मराठवाडा मुक्तिदिनाचे औचित्य साधून अहिल्यानार - बीड - परळी या रेल्वेमार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , पालकमंत्री अजितदादा पवार व पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. त्यावेळी बीड स्थानकास लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांचे नाव द्यावे यासाठी मुख्यमंत्री , पालकमंत्री व पंकजाताई यांना हे निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती गणेश लांडे यांनी दिली. बीड स्थानकास लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांचे नाव द्यावे ही लोकभावना आहे . त्यामुळे ही मागणी मान्य होणार असल्याचा विश्वास गणेश लांडे यांनी व्यक्त केला असून , त्यास मान्यता नाही मिळाल्यास जनआंदोलन उभे करू अशा भावना गणेश लांडे यांनी प्रतिपादन केली आहे.यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, सचिव शांतिनाथ डोरले, प्रदेश उपाध्यक्ष अनिल चांदणे, राजू शहाणे, भाजपा नेते दादासाहेब ननावरे, अप्पासाहेब झोड़गे, सरपंच चंदू मिसाळ इत्यादी सह कार्यकर्ते उपस्थित होते.

### कै.नामदेवराव मोटे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



तालुक्यातील भवानवाडी येथील ज्येष्ठ नागरिक कै.नामदेवराव विठोबा मोटे (अण्णा) यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी मंगळवारी (दि.९) बीड येथील स्वराज्य नगरातील घरी निधन झाले. ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे निवृत्त कर्मचारी होते. मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावामुळे ते पंचक्रोशीत परिचित होते. त्यांचा अंत्यविधी मंगळवारी (दि.८) दुपारी १२ वाजता मुळगावी मोटे वस्ती, भवानवाडी येथे करण्यात आला. त्यांच्या पश्चात संजय मोटे (कॉन्ट्रॅक्टर), आसाराम मोटे (बेलिफ, बीड जिल्हा न्यायालय), तुकाराम मोटे (वरिष्ठ लिपिक, बीड जिल्हा न्यायालय), सुना, नातवंडे व पतरुंड असा मोठा परिवार आहे. अंत्यविधीस बीड जिल्हा न्यायालयातील कर्मचारी, नातेवाईक, मित्र परिवार, पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पिंपळनेर परिसरातील बाजरी काढणीला वेग

पिंपळनेर । प्रतिनिधी

काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने पिंपळनेर परिसरातील जिरायती भागातील बाजरी काढणीला सुरुवात झाली आहे. यावर्षी मे पासूनच बीड तालुक्यातील अनेक भागांत समाधानकारक पाऊस झाला आहे. त्यामुळे परिसरातील ओढे-नाले ओसंडून वाहात आहेत . पाण्याची उपलब्धता पाहून येथील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर बाजरीची पेरणी केली होती. सध्या महिनाभरापासून पावसाने पूर्णपणे उघडीप दिली आहे. तसेच परिसरात उन्हाचा चटका वाढला आहे, त्यामुळे बाजरी काढणीला वेग आल्याचे दिसून येत आहे. बाजरीचे आगार म्हणून प्रचलित असलेल्या परिसरात मागील तीन वर्षांपासून कमी प्रमाणात पाऊस होत होता. यामुळे या परिसरातील खरीप हंगाम ातील बाजरीचा पेरा घटला होता. मात्र, यंदा समाधानकारक पाऊस झाल्याने पिंपळनेरसह परिसरात यंदा मुबलक पाणी उपलब्ध असल्याने परिसरातील बाजरीचे पीक जोमात आले आहे. सध्या काढणीसाठीही पोषक वातावरण आहे. मात्र बाजरी काढणीसाठी पुरेसे मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांपुढील अडचणी वाढण्याची शक्यता आहे. याला पर्याय म्हणून शेतकरी वारंगुळा पद्धतीने एकमेकांच्या शेतातील बाजरी काढणी करत असल्याचेही दिसून येत आहे. बाजरीचा पेरा तसेच खरीप हंगामातील पिकांचा पेरा वाढला आहे. परिसरातील जिरायती जमिनीतील बाजरीच्या पिकांच्या काढणीस सुरुवात झाली आहे. बाजरीची काढणी, खुडणी व मळणी होईपर्यंत पावसाने उसंत घेतल्यास खरीप हंगामातील बाजरीचा हंगाम मार्गी लागेल, अशी आशा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेचा विश्वास शिवसेनेवरच : अशोक पटवर्धन

• महाराष्ट्रातील जनता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच पाठीशी : बापूसाहेब मोरे
• बीडमध्ये शिवसेनेच्या आढावा बैठकीत शिवसैनिकांमध्ये भरले स्फुरण

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जनतेच्या पूर्ण आवाजाला सत्तेत आणण्यासाठी संघटितपणे काम करत आहोत. एकनाथ शिंदे हे विरोधकांना पराभूत करुन जनतेच्या हिताचे कार्य पुढे नेत आहेत. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेचा विश्वास शिवसेनेवरच राहणार असल्याचा विश्वास शिवसेनेचे



मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी व्यक्त केला तर महाराष्ट्रातील जनता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच पाठीशी असून जनतेची सेवा हीच शिवसेनेची खरी ताकद असल्याचे संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शहरातील माळीवेस भागातील हनुमान मंदिरात दि.११ सप्टेंबर रोजी बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर तसेच पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना संपूर्ण ताकदीने प्रत्येक मतदारापर्यंत ▶ उर्वरित पान २ वर

## कलम ३२६ मधील तीन महिने पासुन फरार असलेला काठोडा येथील मुख्य आरोपी जयदत किरकट याचा जिल्हा सत्र न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील काठोडा गावातील एका शुल्लक कारणावरून ब्रम्हनाथ कोकरे यांच्या वर तीन जणांनी हल्ला केला होता या हल्लयात कोकरे यांचा हात फ्रॅक्चर झाला होता.

तसेच स्कारपीओ गाडीने धडक देऊन हल्ला करून मारहाण केली व जीवें मारण्याची धमकी दिली होती त्या प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशन येथे दिं.३/६/२०२५ रोजी आरोपी मुख्य आरोपी जयदत्त किरकट,व लहूराव किरकट, व तुकाराम किरकट,यांच्या विरोधात विविध कलमानी हल्ल्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी तीन महिन्यापासून फरार मुख्य आरोपी जयदत्त किरकट, यांनी अटकपूर्व जामीन मांडली होती यांचा जामीन बीड जिल्हा सत्र न्यायालयाने त्याची जामीन दिं.४/९/२५ रोजी फेटाळली आहेत. अटकपूर्व जामीन मांडली होती यांचा जामीन बीड जिल्हा सत्र न्यायालयाने त्याची जामीन दिं.४/९/२५ रोजी फेटाळली आहेत.

## गणेश विसर्जनावेळी नियम मोडणाऱ्या डी जे वाहनांवर कारवाई

**१५ डी जे वाहनांवर जप्ती ; RTO कडून तब्बल ₹५ लाखांहून अधिक दंड वसूल**

बीड । प्रतिनिधी

गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी बीड पोलीस दलाकडून विशेष मोहिम राबविण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित लवाद व राज्य शासनाने घालून दिलेल्या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांनी शहरातील विविध ठिकाणी तपासणी केली. या मोहिमेदरम्यान DJ (Dolby) वाद्यांच्या प्रचंड आवाजामुळे नियमांचे उल्लंघन होत असल्याचे आढळून आले. यावेळी पेठबीड, शिवाजीनगर व बीड शहर



या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकूण १५ ञा वाहनांवर कारवाई करत ती जप्त करण्यात आली. या संदर्भातील अहवाल उपप्रादेशिक परिवहन विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यावरून विभागाकडून नमूद वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून तब्बल ₹५,०४,०००/- इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. जप्त वाहनांमध्ये MH16Q1021, MH04BU4593, MH12D8424, MH10Z437, MH20T2394, MH33-3076, MH04DK1805, MH50-2678, MH23-5209, MH23S1650, MH23S1605, MH38B3496, MH25D2183, MH16CD8383 d MH23U635९ या वाहनांचा समावेश आहे.

## चौसाळा पत्रकार संघातर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**माध्यमिक विभागातून सुभाष काकड, जय माला साबणे तर प्राथमिक विभागातून श्रीमंत खाकरे व सविता कदम होणार सन्मानित**

चौसाळा । प्रतिनिधी

५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा होत असून याचे औचित्य साधून चौसाळा पत्रकार संघाने आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याचे जाहीर केले आहे त्यानुसार चौसाळा जिल्हा परिषद शाळेतील माध्यमिक मधून माझी मुख्याध्यापक सुभाष काकड व गुरुदत्त कन्या प्रशालेच्या माझी मुख्याध्यापिका जयमाला साबणे यांना चौसाळा पत्रकार संघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे तर प्राथमिक शिक्षण विभागातून कै. चांदमलजी लोढा विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्रीमंत खाकरे व सुलतानपूर येथे जिल्हा परिषद शाळेमध्ये कार्यरत असलेल्या सविता कदम यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिना दिवशी हा पुरस्कार देण्यात येणार आहेत.



पुरस्कार जाहीर करण्यासाठी पत्रकार संघाची बैठक घेण्यात आली यावेळी पत्रकार संघाचे मार्गदर्शक बळीराम राऊत. एन टी वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसाद देशमुख, मिराज मुलानी, लहू नाईकवाडे, खाजा मिया जहागीरदार तसेच इतर पत्रकार बांधव उपस्थित होते.

## 13 कोटींच्या रस्त्याला खड्डे नव्हे तर भगदाड!

**ग्रामस्थांच्या जीवाला धोका - दुरुस्ती केव्हा करणार जिल्हाध्यक्ष मस्के साहेब : डॉ.गणेश ढवळे**



लिंबागणेश । प्रतिनिधी

तत्कालीन ग्रामविकास मंत्री व विद्यमान पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री ग्रासडक योजनेंतर्गत सन २०१५ ते २०२१-२२ या कालावधीत तब्बल १९३३ किलोमीटर लांबीचे व १९८६ कोटी रुपये किंमतीचे रस्ते ग्रामीण भागात दळणवळण सुधारण्यासाठी आणले होते. मात्र कंत्राटदार आणि राजकीय कार्यकर्त्यांच्या संगनमताने या रस्त्यांची दुर्दशा झाली असून निधी गिळंकृत झाल्याचा आरोप होत आहे.

बीड तालुक्यातील पालवण-लिंबागणेश (प्राजिमा ३१), आहेर धानोरा, वरवटी, भाळवणी, बेलेश्वर-लिंबागणेश हा सुमारे २४ किलोमीटर लांबीचा रस्ता १२ कोटी ७५ लाख रुपये खर्चून एम.टी. मस्के कन्स्ट्रक्शन (जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे बंधू) यांनी केला. मात्र सुरूवातीपासूनच निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ग्रामस्थांना हाल सोसावे लागत आहेत.

तक्रारीनंतर थातुरमातुर ठिगळं लावण्याचं काम होतं, पण काही दिवसातच रस्त्यावरचे खड्डे पुन्हा उघडं तोंड करून उभे राहतात. आता तर परिस्थिती भीषण बनली असून अनेक ठिकाणी मोठे भगदाड पडून पुलांच्या नळ्या उघड्या दिसत आहेत. यामुळे पावसाळ्यात पाणी साचल्याने खड्डा दिसत नाही आणि दुचाकीस्वारांचे जीव धोक्यात येत आहेत. अवजड वाहनेही याच रस्त्यावरून जात असल्याने भगदाड अधिक खोलवर जात आहे. अपघात टाळण्यासाठी आणि जनतेच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी मस्के कन्स्ट्रक्शनने तातडीने दर्जेदार दुरुस्ती करावी, अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.



बीड येथील श्री. गजानन महाराज मंदिरामध्ये बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी महापूजा करुन गुरुवार रोजी महाप्रसादाचे वाटप करताना शेळके कुटुंबीय व भाविक भक्त छायाचित्रात दिसत आहेत.